# प्रेस नोट

## नोकरी लावुन देतो म्हणुन लाखोचा गंडा घालणारा बोगस पोलीस अधिकारी (पीएसआय) हडपसर पोलीस स्टेशच्या जाळयात

हडपसर पोलीस स्टेशन हददीत नोकरी लावुन देतो म्हणुन काही लोकांची फसवणुक झालेली होती त्याअनुषंगाने हडपसर पोलीस स्टेशनला तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने दिनांक १९/०३/२०१९ रोजी हडपसर पोलीस स्टेशनला फसवणुकीचा एक गुन्हा नोंद झाला होता. सदरचा आरोपी हा त्याचे नाव पीएसआय संजय शिंदे असे सांगत होता व सगळयांना तो स्व:ता पोलीस अधिकारी असल्याचे व त्याची मोठमोठया कंपनीमध्ये त्याची ओळख असुन तो नोकरी लावुन देतो असे सांगुन लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी तो स्वत:चे बनावट आयकार्ड लोकांना दाखवत होता. त्याच्या या रहाणीमानामुळे व बनावट आयकार्डमुळे सर्वसामान्य लोक त्याच्या जाळयात अडकत होते. लोकांना भेटण्यासाठी तो एका लाल रंगाच्या आय १० याकारमधुन तो येत होता व त्या कारच्या काचेच्या आतमध्ये पोलीस नावाची पाटी लावलेली असायची. सदरचा आरोपी हा लोकांना भेटण्यासाठी वेगवेगळया ठिकाणी बोलवायचा त्यामुळे त्याचा ठावठिकाणा पोलीसांना लागत नव्हता. आरोपी फक्त फोनवरुन लोकांशी संपर्क करायचा आणि पैसे देण्याच्या वेळेसच भेटायचा आणि एकदा की पैसे हातात आले की, त्या माणसाचा फोन तो कधीच उचलत नव्हता किंवा तो नंबर ब्लॉकलिस्टला टाकायचा.

सदर गुन्हयाचा तपास मा.वपोनि श्री.सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे हे करीत असतांना सपोनि लोणारे, पोशि/ नरसाळे व पोशि/अमित कांबळे यांना एक गोपनिय माहीती मिळाली की, वरील वर्णनाची एक कार नंबर एमएच १२ ईटी ३७९७ मधुन एक इसम हा लोणीटोल नाक्यावरुन पुणे दिशेने येणार आहे म्हणुन तात्काळ सपोनि लोणारे यांनी त्यांचे स्टाफसह त्याठिकाणी धाव घेवुन योग्य तो सापळा रचला व सदर वर्णनाची एक कार त्यांना लोणी टोल नाका पार करुन येतांना दिसली म्हणुन पोलीसांनी तिला थांबण्याचा इशारा केला परंतु त्याने त्याची कार न थांबवता आकाश लॉन्ससमोरुन मांजरी कडे जाणा-या मोरेवस्तीकडे वळवली. सदर कारचा पाठलाग करुन कार अडवुन कारमधील इसमास ताब्यात घेतले असता त्याने पोलीसांना पीएसआय असल्याचे सांगीतले यावर पोलीसांनी त्याचेकडे आयकार्डची मागणी केली असता त्याने त्याचे बनावट आयकार्डही पोलीसांना दाखविले परंतु हे बनावट आयकार्ड सपोनि लोणारे यांनी लगेच ओळखले व आरोपीस गाडीसह ताब्यात घेवुन हडपसर पोलीस स्टेशनला घेवुन येवुन सखोल चौकशी केली असता हा बोगस पोलीस अधिकारी असल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीकडे सखोल चौकशी केली असता आरोपी याने सांगीतले की, आरोपीचे लग्न झालेले असुन त्याला दोन मुले असुन सध्या तो काळेपडळ, हडपसर पुणे येथे राहण्यास आहे. त्याचे शिक्षण १२वी पर्यत झालेले असुन त्यानंतर त्याने कोहीनुर इंन्स्टीटयुट मधुन २०१४ मध्ये मॅकेनिकल इंजिनिअरींग केली आहे. आरोपीला पोलीस ड्रेसचे खुप आकर्षण असल्याने त्याला पोलीस बनायचे होते परंतु पोलीस न झाल्यामुळे त्याने इनऑर्बीट मॉल विमानगर मध्ये इंजिनिअरींग डिपार्टमेंटमध्ये नोकरी स्विकारली. परंतु पुण्यासारख्या शहरातील ऐशआराम जिवन पाहुन ते जगण्यासाठी पैश्याची चणचण भासु लागल्याने आरोपी याने नामी युक्ती शोधली व पीएसआयचा ड्रेस विकत घेवुन तो घालुन फोटो काढुन एक बनावट आयकार्ड बनविले व त्यानंतर त्याने सर्वसामान्य

कुटुंबातील बेरोजगार तरुण शोधुन त्यांना संपर्क करुन नोकरी लावण्याचे आमीष दाखवुन त्यांचेकडुन पैसे लुबाडण्याची नामी शक्कल शोधली. आरोपीने आपला कोणाला संशय येवु नये म्हणुन वेगवेगळ्या ठिकाणी पोलीस ड्रेसवर लोकांना भेटुन त्यांचा विश्वास संपादन करुन गंडा घालतलेला आहे. दाखल गुन्हयातील फिर्यादी यांना समक्ष बोलावुन आरोपीस दाखविले असता फिर्यादीने आरोपीस ओळखले आहे व अश्याच प्रकारे खुप लोकांना सदर आरोपीने फसविल्याबाबतची माहीती समोर आलेली आहे. सदरच्या आरोपीने पुणे व पुण्याबाहेरच्या ब-याच लोकांना गंडा घातल्याचा संशय आहे. या आरोपीवर सहा महीन्यापुर्वीच तळवाडा पोस्टे येथे बोगस पोलीस अधिकारी असल्याबाबतचा गुन्हा दाखल आहे. तरी पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे हे करीत आहे.

तरी जनतेला जाहीर आव्हान आहे की, अश्या प्रकारची कोणाची फसवणुक झालेली असेल त्यांना हडपसर पोलीस स्टेशन येथे संपर्क साधावा.

सदरची कामगीरी ही मा.सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो. पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा.प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो. परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा.सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो.हडपसर विभाग पुणे,यांचे सुचनेनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक शिवाजी शिंदे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार, यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे, सपोनि चव्हाण, पोहवा/राजेश नवले, पोना/बजरंग धायगुडे, पोशि/अनिल कुसाळकर, पोशि/ अमित कांबळे, पोशि/ शाहीद शेख, पोशि/ ज्ञानेश्वर चित्ते यांनी केली आहे.

(सुनिल तांबे)
वरीष्ठ पोलीस निरीक्षक
हडपसर पोलीस स्टेशन,पुणे

